महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं/३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना/०७/२०२५, मुंबई, ई.स्वाक्षरीस सादर

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक- वशिअ-२०२५/ प्र. क्र.१७ / विचौ - १ , दि.२५/०८/२०२५.

**विषय :-** शिस्तभंगाविषयक कारवाईच्या अनुषंगाने किरकोळ शिक्षा देण्यास सक्षम प्राधिकारी घोषित करणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्रमांक- वशिअ -२०२५/प्र. क्र. १७ / विचौ - १, दि.२५/०८/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०८२५१२३८१६१९०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
PRAVIN MADHUKAR SHIKHARE
Date: 01-09-2025 12:03:36

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था/ नियोजन व समन्वय/आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गासह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.

सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.

सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**शिस्तभंगविषयक कारवाईच्या अनुषंगाने किरकोळ शिक्षा देण्यास सक्षम प्राधिकारी घोषित करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक : वशिअ २०२५/प्र.क्र.१७ /विचौ-१**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २५ ऑगस्ट, २०२५

वाचा :-

**१.** महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ नियम ६ व नियम ७

**२.** सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक – वशिअ २०२५/ प्र.क्र.१७/ वि.चौ.१ दि.०७.०४.२०२५

**३.** सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक – वशिअ २०२५/ प्र.क्र.१७/ वि.चौ.१ दि.१०.०६.२०२५

**शासन परिपत्रक :-**

शासकीय कर्तव्ये पार पाडीत असताना शासकीय कर्मचाऱ्याकडून घडलेल्या अपराध, गैरवर्तणूक किंवा गैरवर्तनाच्या अनुषंगाने जेव्हा महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ अनुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे योजिले जाते, तेव्हा अशी शिस्तभंगविषयक कार्यवाही करताना ती सक्षम प्राधिकाऱ्याने निदेशित करणे अत्यावश्यक आहे. याकरिता, सर्व प्रशासकीय विभागांना त्यांचे नियंत्रणाखालील शिस्तभंगविषयक प्राधिकारी घोषित करण्याबाबत दि.०७.०४.२०२५ रोजीच्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे.

**२.** महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ७ अनुसार, शासकीय कर्मचाऱ्याला नियम ५ मध्ये नमूद केलेली कोणतीही शिक्षा करण्याचा अधिकार असलेला शिस्तभंगविषयक प्राधिकारी हा विभागीय चौकशी सुरु करण्यास सक्षम प्राधिकारी आहे.

**३.** महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) १९७९ च्या नियम ६ अनुसार किरकोळ शिक्षांचे अधिकार कोणास राहतील याची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार,

| **किरकोळ शिक्षा देण्यास सक्षम प्राधिकारी** | **कर्मचाऱ्यांचे गट** |
|---|---|
| कार्यालय प्रमुख | संबंधित प्रशासकीय नियंत्रणाखालील गट 'क' व गट 'ड' मधील शासकीय कर्मचारी |
| विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख | त्यांचे संबंधित प्रशासकीय नियंत्रणाखालील राज्यसेवा गट-ब मधील शासकीय कर्मचारी |
| प्रशासकीय विभाग प्रमुख | त्यांचे संबंधित प्रशासकीय नियंत्रणाखालील वेतन स्तर एस-२३ (ग्रेड वेतन रूपये ६,६००/-) किंवा त्यापेक्षा कमी वेतनस्तर असणारे राज्यसेवा गट-अ मधील शासकीय कर्मचारी |
| **रोजगारी हमी योजनेच्या बाबतीत** | |
| विभागीय आयुक्त | वेतन स्तर एस-२३ (ग्रेड वेतन रूपये ६,६००/-) किंवा त्यापेक्षा कमी वेतनस्तर असणारे राज्यसेवा गट-अ तसेच राज्यसेवा गट-ब मधील शासकीय कर्मचारी यांना किरकोळ शिक्षा |
| | गट क आणि गट ड –मधील शासकीय कर्मचारी सर्व शिक्षा |

४. काहीवेळा कर्मचाऱ्याने केलेली अनियमिततेचे स्वरुप फारसे गंभीर नसल्याचे निदर्शनास येते अशावेळी अशा कर्मचाऱ्यास किरकोळ शिक्षा देय ठरते. अपचाऱ्यास वेळीच शिक्षा होऊन कार्यालयामध्ये शिस्त राहणे आवश्यक आहे. अन्यथा विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस विलंब झाल्यास व त्यानुषंगाने शिक्षेस विलंब झाल्यास, अन्य कर्मचाऱ्यांमध्ये चूकीचा समज पसरतो. यास्तव, अशा अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्दची विभागीय चौकशीबाबतची कार्यवाही सुरु करण्यास व चौकशीची प्रकरणे निकाली काढण्यासाठी होणारा विलंब टाळण्यासाठी खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

१) महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे किरकोळ शिक्षेस मान्यता देणारे सक्षम प्राधिकारी घोषित करण्यात यावेत.

२) महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ७ अनुसार शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यास विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करता येईल.

३) परि.३ मध्ये नमूद केल्यानुसार किरकोळ शिक्षा देण्यास सक्षम प्राधिकारी घोषित केल्यानंतर सदर अधिकाऱ्याच्या लगतच्या वरिष्ठ प्राधिकाऱ्याकडे अपीलाबाबतचे अधिकार सोपविण्यात यावेत.

४) उपरोक्त तरतूदी लक्षात घेवून सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांचे नियंत्रणाखालील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रकरणी किरकोळ शिक्षा, जबर शिक्षा देण्यास सक्षम प्राधिकारी व अपीलीय प्राधिकारी घोषित करावेत.

५. सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांचे नियंत्रणाखालील अधिकारी / कर्मचारी यांचेकरिता **शिस्तभंगविषयक प्राधिकारी कोण राहतील याबाबतचे आदेश निर्गमित करताना उपरोक्त सूचनांचे पालन करावे. त्यानुसार, आवश्यक ते आदेश तात्काळ निर्गमित करावेत व ते शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करावेत.** शिस्तभंग विषयक प्रकरण सादर करतेवेळी सदर आदेशान्वये घोषित केलेले शिस्तभंग विषयक प्राधिकारी नमूद करुनच प्रकरण सादर करणे अनिवार्य करण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०२५०८२५१२३८१६१९०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUCHITA MOHAN MAHADIK

Digitally signed by SUCHITA MOHAN MAHADIK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=6578e224c4a0d2c9bfb7e7e33b474757c1425d0a03e653bc4f0a25b70698158e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E146A6DDC8FB6681D49A5099661D41639DA6C568419F071BB9CDFD8A2E08058C, cn=SUCHITA MOHAN MAHADIK
Date: 2025.08.25 12:39:09 +05'30'

**(सुचिता महाडिक)**
**सहसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

३. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव,
४. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव,
५. सर्व मा.मंत्री/ मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
६. मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, विधानभवन मुंबई,
७. मा.विरोधी पक्ष नेता विधानसभा, विधानभवन मुंबई,
८. सर्व मा. संसद सदस्य,
९. सर्व मा.विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
११. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव,
१२. सर्व मंत्रालयीन विभाग,
१३. प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद व नागपूर,
१४. प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद व नागपूर,
१५. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद व नागपूर,
१६. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१७. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), मुंबई,
१८. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), मुंबई,
१९. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२०. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
२१. सचिव, राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे कार्यालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई,
२२. प्रबंधक, राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई,
२३. सर्व विभागीय आयुक्त,
२४. सर्व जिल्हाधिकारी,
२५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२७. सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख, (मंत्रालयीन विभागांनी संबंधितांना प्रत पाठवावी)
२८. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधानभवन, मुंबई
२९. निवडनस्ती